नि.फौ.के.नं. ०३/२०२१

नि. क्र. ५३

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०४ चा जबाब**

**नाव** – पल्लवी रमांकांत जाधव, **वय**– ३७ वर्षे,

**व्यवसाय** – गृहिणी, **सध्या रा.** रत्नागिरी,

**कायम रा.** चाफवली सरोदेवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**सरतपास – सरकारतर्फे सरकारी वकील श्रीम. ए. व्ही. गुरुपादगोळ यांचेकडून –**

०१. चाफवली येथे माझ्या घरी माझी सासू, नणंद वेदीका यादव, पुतण्या सागर, त्याची पत्नी सानवी, माझे पती रमाकांत हे लोक राहतात. माझी दुसरी नणंद वाडीमध्येच राहते. दि. १५/०७/२०२० रोजी ती शाळेचे काही कागदपत्रे पाहण्यासाठी घरी आली होती. ती कागदपत्रे एका सुटकेसमध्ये होती. त्यावेळी कागदपत्रे सुटकेसमध्ये पाहत असताना तीने माझी सासू आणि दुसरी नणंद वेदीका हीच्या समक्ष माझ्या सासुचे सर्व दागीने सुटकेसमध्ये व्यवस्थीत असल्याचे समक्ष दाखवले.

०२. दि. ०२/०८/२०२० रोजी सकाळी आठ साडेआठच्या सुमारास पोलीस पाटील विजय चाळके, प्रकाश कांबळे आणि सरपंच अपर्णा कांबळे आमच्या घरी आले. त्यावेळी त्यांनी माझ्या सासूबाईंना हाक मारली. त्यावेळी त्यांनी त्यांना का आले म्हणून विचारले. त्यावेळी माझा पुतण्या सागर त्याच्या खोलीतून बाहेर आला व त्याने त्याच्या हातातील डबी खाली जमिनीवर ठेवली. त्यावेळी पोलीस पाटलांनी आम्हाला विचारले की, हे दागीने कोणाचे आहेत बघा. त्यावेळी माझी सासू ते दागीने आमचे असल्याचे त्यांना म्हणाल्या.

०३. पोलीस पाटलांनी माझा पुतण्या सागर यांना ते दागीने पोलीस स्टेशनला न्यायला सांगीतले. त्यानंतर माझी नणंद स्वाती यादव हीने सदरचे दागीने चोरल्या बाबत आरोपी क्र. ०१ ते ०३ यांच्या विरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली. सर्व आरोपींना पाहील्यास मी ओळखु शकते. आज रोजी आरोपी क्र.०२ न्यायालयात उपस्थीत नाहीत.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपींतर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांचेकडून –</u>**

०४. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती आणि माझी नणंद यांची या केसकामी साक्ष नोंदवली आहे हे मला माहीती आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यांची साक्ष झाल्यानंतर आजतागायत त्यांच्यात आणि माझ्यात काय साक्ष द्यायची याबाबत चर्चा झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी व्यक्तीशः माझ्याकडे कधीही या केसकामी चौकशी केली नव्हती. हे मला आठवत नाही की, माझ्याकडे तथाकथीत घटना घडल्यानंतर कीती दिवसांनी पोलीसांनी चौकशी केली.

०५. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती महाराष्ट्र परीवहन मंडळात कर्मचारी असल्याने आम्ही रत्नागिरी येथे राहतो. तथाकथीत घटना घडण्यापुर्वी चार दिवस आधी आम्ही चाफवलीला आलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्या चार दिवसांपुर्वी महीनावर आधी आम्ही चाफवलीला आलो नव्हतो.

०६. हे म्हणणे खरे आहे की, माझे आणि माझ्या पतीचे दोन्ही नणंदांशी संबंध चांगले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझी नणंद वेदीका शिक्षीका म्हणून नोकरीस आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या नणंदेचे चाफवली आणि कारवांचीवाडी येथे दोन्ही ठिकाणी घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, तीच्या कारवांचीवाडी येथील घरामध्ये सर्व लागणा–या सोयी–सुविधा आहेत. हे म्हणणे खरे आहे की, स्वातीचे पती देखील शासकीय सेवेतुन निवृत्त आहेत.

०७.	हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.०३ लांजा येथे नोकरीला आहेत. हे मला माहीती नाही की, लांजा येथे त्यांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती किंवा मी आरोपी क्र.०३ यांच्याकडे कधीही येत–जात नाही.

०८.	हे मला आठवत नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर की, त्यावेळी कागदपत्रे सुटकेसमध्ये पाहत असताना तीने माझी सासू आणि दुसरी नणंद वेदीका हीच्या समक्ष माझ्या सासुचे सर्व दागीने सुटकेसमध्ये व्यवस्थीत असल्याचे **समक्ष दाखवले**, हा मी पोलीसांना टिपण देताना सांगीतले होते अगर कसे. हे म्हणणे खरे आहे की, माझी नणंद वेदीका तीच्या लग्नानंतर काही दिवसांतच तीच्या पतीपासून विभक्त माहेरी राहते.

०९.	हे मला माहीती नाही की, आरोपी क्र.०१ ने पोलीस पाटील यांना आदल्या रात्री घरी यायला बोलावले होते म्हणून ते आले होते अगर कसे. हे मला आठवत नाही की, आरोपी क्र.०१ त्याच्या पत्नीसोबत दि. २९/०७/२०२० ते ०१/०८/२०२० या दरम्याने मु.पो. वडवली येथे गेला होता. हे मला आठवत नाही की, दि. ०१/०८/२०२० रोजी तो चाफवली येथे पत्नीसह माघारी आला होता. हे मला माहीती नाही की, साफसफाई करुन झाल्यानंतर आरोपी क्र.०१ ने बसण्यासाठी चटई काढली असता त्यातून काहीतरी पडल्याचा आवाज आला. हे मला माहीती नाही की, त्यामध्ये एक डबी होती. हे मला माहीती नाही की, त्या डबीमधील सोन्याचे दागीने कोणीतरी त्यात ठेवल्याचा संशय आल्याने त्याने आदल्या दिवशीच पोलीस पाटलांना फोन केला होता. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस पाटलांसमक्ष ते दागीने समोर आणण्यात आले होते.

१०.	हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने आणि नणंद वेदीका हीने आरोपी क्र.०१ व त्याच्या पत्नीला अश्लील शिवीगाळ केली. हे मला माहीती नाही की, या विषयी त्यांनी माझ्या पती विरुध्द आणि नणंदे विरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार

दाखल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला माझ्या विरुध्द दाखल असलेल्या केसमध्ये काय मजकुर किंवा तक्रार आहे हे माहीती आहे. हे म्हणणे खरे आहे की, स.के.नं. २१९/२०२० या आरोपीव्दारे आमच्या विरुध्द दाखल केलेल्या केसमध्ये आमच्या विरुध्द, माझ्या पतीने आणि नणंदेने आरोपी क्र.०१ व त्यांच्या पत्नीला अश्लील भाषेत शिवीगाळ केल्या बाबत आरोप आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या विरुध्द दाखल केलेल्य कसेमुळे मी आरोपी क्र.०१ ते ०३ विरुध्द खोटी साक्ष देत आहे.

११. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस पाटलांनी आरोपी क्र.०१ ला तथाकथीत दागीने पोलीस स्टेशनला सुपुर्त कर असे सांगीतल्याने त्याने पोलीस स्टेशनला ते दागीने जमा केले. हे म्हणणे खरे नाही की, दि. १५/०७/२०२० रोजी ती शाळेचे काही कागदपत्रे पाहण्यासाठी घरी आली होती, ती कागदपत्रे एका सुटकेसमध्ये होती, त्यावेळी कागदपत्रे सुटकेसमध्ये पाहत असताना तीने माझी सासू आणि दुसरी नणंद वेदीका हीच्या समक्ष माझ्या सासुचे सर्व दागीने सुटकेसमध्ये व्यवस्थीत असल्याचे समक्ष दाखवले, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर खोटा आहे व आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.01.28 18:19:47 +0530

**(श्रीमती एस.एच.पाटील)**

**दिनांक – २७/०१/२०२५** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**